


स्थापना : १९६४

६२

मासिक

# नवस्नेह

हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

वर्ष १२ वे : अंक ६ ▪ सप्टेंबर २०२६

किंमत : 20 रु.



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# विद्यार्थी गुणगौरव व मान्यवरांचे सन्मान

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यार्थी गुणगौरव आणि सामजिक कृतज्ञता सन्मान ब्राह्मण सभा करवीर-मंगलधामच्या सभागृहात समारंभपूर्वक वितरीत करण्यात आले. त्या कार्यक्रमाची क्षणचित्रे.






दामोदर शिवराम आणि कंपनीचे चेअरमन श्री. प्रकाशजी गद्रे आणि
ज्येष्ठ नेत्रशल्यचिकित्सक डॉ. श्री. माधव खरे यांना समाजभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले.







श्री. दत्तात्रय बापट गुरुजी यांचा वैदिक सन्मान देऊन गौरव करण्यात आला तर
श्रीमती मनिषा काळे यांना आदर्श माता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.





श्री. अजय केळकर यांचा पत्रकार सन्मान देऊन गौरव करण्यात आला तर
श्री. संजीव चिपळूणकर यांना सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.






या कार्यक्रमात विविध परीक्षांत यशस्वी झालेल्या ७५ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे श्री. आदेश गोखले यांच्या हस्ते गौरविण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचाही सपत्निक सत्कार परशुराम पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. मुकूंद गोरे आणि उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमानंतर खाद्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. खाद्यमहोत्सवास सभासद आणि त्यांचे पाल्य मिळून २५० पेक्षा अधिक उपस्थिती होती.

पुढील मजकूर कव्हर पान ३ वर पाहा...

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

वर्ष १२ वे : अंक ६ : सप्टेंबर २०२६

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ.मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984

## अनुक्रम

१) संपादकीय /४
२) सुशिला दिवाण /५ - वैदेही जोशी
३) मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /७ - ओंकार गाडगीळ
४) कल्पक्कमची कमाल /८ - आंतर्जालावरून
५) ज्ञानसूर्याची सावली /१० - सौ. मंजुश्री गोखले
६) सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /१३ - सौ. मंजुश्री गोखले
७) पालकत्त्व /१६ - कमला हर्डीकर
८) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर/२० - विकास मेहेंदळे
९) अवीट गोडीचे गीतरामायण /२४ - श्री. सुधीर दाजी जोशी
१०) वधूवर माहिती यादी /२५

- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०



हीरकमहोत्सवी

**कोल्हापूर चित्पावन संघ**

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५ ०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २३ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

श्रावण-भाद्रपद म्हणजे हे ऐन सणांचे दिवस सध्या सुरू आहेत. आपले सगळे मोठे सण या चातुर्मासातच येतात ! नागपंचमी झाली. या महिन्यात आता बाप्पा येतील ! आठ दिवस सर्वांकडून यथासांग मनोभावे सेवा करून घेतील आणि भक्तजणांना कृपाशीर्वाद देऊन संतुष्टतेने परतही जातील !

दरवर्षीच असे साऱ्या जगताचं कल्याण करायला बाप्पा येतात आणि भक्तांची मने कातर करून निघूनही जातात. बाप्पांच्या पाठोपाठ दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी देवी येणार !

मित्रांनो, हेच तर आपल्या हिंदू संस्कृतीचं मोठं वैशिष्ट्य आहे ! मानवी प्रयत्नांना देवकृपेची जोड लाभली, की आपोआप यशाचं शिखर गाठता येतं ! आणि प्रयत्न करणाऱ्याच्या पाठीशी परमेश्वर नेहमीच उभा असतोच असतो !

आपणासाठी नवस्नेहचा प्रत्येक नवा अंक तयार करताना आमचाही हाच दृष्टिकोन असतो ! नियमित लेखकांच्या उत्तम साहित्यासह आंतर्जालावरही जे जे चांगलं काही गवसतं ते आवर्जून अंकात आम्ही तुमच्यासाठी उपलब्ध करून देतो ! असो.

मंडळी, पाऊस छान पडतो आहे ! सर्व पाणीसाठे, धरणे बऱ्यापैकी भरत आली आहेत. हवेत गारवाही बऱ्यापैकी आहे. तरी वातावरण विचित्र वाटावं असंच आहे. सणांचा उत्साह ओसांडत असला तरी नवे केलेले रस्ते पावसाने वाहून गेलेले आहेत ! तुम्ही रस्त्यावरच्या खड्ड्यांची आणि आपल्या सुरक्षेची खूप काळजी मात्र घ्या हं ! कारण वरून पाऊस आणि खाली पाण्यानं भरलेले खड्डे ! काही लहान-मोठे अपघात व्हायला कुठं दुसरीकडं बाहेर जायलाच नको ! अर्थात, या सणांचा उत्साह बाकी एवढा असतो ना, की अशा काही गोष्टी किरकोळच वाटतात !

मित्रांनो, बरोबर एक वर्षापूर्वी आपल्या कोल्हापूरला मुंबई हायकोर्टाच्या सर्किट बेंचचं उद्घाटन झालं. आणि ज्या न्यायमूर्तींच्या पुढाकाराने ते बेंच इथं आलं त्या न्या. भूषण गवईंच्या हस्ते नुकताच प्रथम वर्षपूर्तीचा सोहळाही मोठ्या थाटामाटानं संपन्न झाला !

थोड्या विनोदानं - आपल्या कोल्हापूरकरांना आता मारामारी, भांडणासाठी रान मोकळं झालं म्हणायला हरकत नाही ! निकालासाठी यातायात नको करायला ! निकाल हितंच ! जवळच तर लागेल ! असो.

एक मात्र खरं की, अशा जेवढ्या म्हणून सुधारणा होतात, त्यांचा गैरवापर कसा करता येईल हे बघण्यात काही हायटेक मंडळी ताबडतोब एक्सपर्ट होतात ! अर्थात, ही मानवी प्रवृत्ती आहे, आणि ती बदलणार आहे थोडीच ! असो. सोनेरी ढगाला काळी किनार असतेच ना? तसंच हे ! शेवटी जीवन आणि जगणारा माणूस कुणालाच कळत नाही हेच खरं !

**जिंदगी जब मुझे लगा**
**मैने तुझे पढ लिया**
**लेकिन न जाने तुने**
**एक पन्ना और खोल दिया।**

असं आहे मित्रांनो !

तर मंडळी आता पुढचा अंक दिवाळी अंक ! दरवर्षी सारखाच माहितीपूर्ण लेख आणि कथांनी भरलेला! तुमचा दिवाळीचा गोडवा आणखी वाढवणारा! त्या नवस्नेह दिवाळी अंकाच्या प्रतिक्षेत राहा !

तुम्हा सर्वांना नवरात्रीच्या आणि दसऱ्याच्या मंगलमय अनंत शुभेच्छा ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# सुशिला दिवाण

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पुरुषांप्रमाणेच महिलांनीही अतुलनीय शौर्य, त्याग आणि धैर्य दाखवले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक वीरांगनांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय महिलांच्या सामर्थ्याची जगाला जाणीव झाली.

सुशिला दिवाण यांच्या जन्मदिनांकाची तशी विशेष नोंद नाही. बालपणापासूनच त्या गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात राहात होत्या. त्यांचे पती प्रभाकर दिवाण हे आश्रमात गांधीजींचे पुस्तकालय संभाळीत होते, तसेच चरखा संघातही काम करीत होते. सुशिलाताई व प्रभाकर दोघेही भूमिगत राहून काम करीत असत. प्रभाकर सेवाग्राम आश्रमात होते. त्यामुळे सुशिलाताई तेथेच राहू लागल्या. त्यावेळी आश्रमात खूप मंडळी असत. या सर्व मंडळींना गांधीजी सफाईसाठी पाठवायचे. सुशिलाताईंकडे संडास सफाईचे महत्त्वाचे काम सोपवले होते. संडास सफाईचे काम संपल्यानंतर त्या गावामध्ये जात असत. गांव आणि आश्रम यामध्ये अंतर होते. एखादे वेळी संडास सफाईच्या कामाला वेळ लागला किंवा आजारी व्यक्तीच्या संडास सफाईच्या कामाने एखादे दिवस गावात सफाईसाठी जाता आले नाही तर गावातल्या बायका ओरडायच्या. बापूचे पैसे फुकटचे खातेस काय तू? असा जाब विचारायच्या. प्रथम प्रथम सुशिलाताई त्यांना खड्या आवाजात सांगायच्या की गांधीजी आम्हाला पैसे देत नाहीत. त्यांच्या आदेशानुसार आम्ही काम करतो. पण त्यावेळी त्यांच्याबरोबर असलेल्या सरलाबेन सुशिलाताईना शांत करायच्या. 'असे पटदिशी रागवायचे नाही', असेही त्या सांगायच्या. सुशिलाताई गोवरी आश्रमातून विनोबांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी गावोगावी जात असत. लोकांना स्वातंत्र्याचे, स्वच्छतेचे, स्वावलंबनाचे, खादीचे महत्व पटवून देण्यासाठी व्याख्यानेही देत असत. १९४२ च्या लढ्याच्या वेळी सुशिलाताईंकडे बुलेटीन वाटण्याचे काम दिले. सुपे, दुरड्या, टोपल्या विकणाऱ्या बाईसारखा पोषाख करून त्या गावोगावी फिरत असत आणि आपल्या दुरड्यात लपवलेली पत्रके लोकांत वाटत असत. अशा पत्रके वाटण्या-प्रसंगी नारायण जाजू यांच्या मार्गदर्शनाखाली फाटकी साडी त्या नेसत असत. १०-१५ दिवस डोक्याला तेल लावलेले नसे, आणि कसे ओरडायचे याचेही मार्गदर्शन नारायण जाजू यांनी केले होते. अशाच एकदा पत्रके वाटण्यास रात्री जात असता सेवाग्राम शेजारील रेल्वे बोगद्यातून त्या जात होत्या. काखेमध्ये सुपे, दुरड्या घेतलेल्या होत्या. इतक्यात समोरून पोलीस आले. ताईने त्वरीत दुरडी डोक्यावर घेतली आणि म्हणाली, 'सुप घेता का सुप' त्यांच्याकडे बॅटरीने प्रकाशज्योत टाकीत ते म्हणाले, 'उद्याला ये, आम्ही ड्युटीवर आहे'. पोलिसांनी त्यांना ओळखलेच नव्हते. त्यांच्याकडील बुलेटीन्स करंदीकर वकीलांच्याकडे देण्यासाठी त्या गेल्या. दारात उभे राहून 'कडे घेता का कडे' असे मोठ्याने ओरडू लागल्या. पण घरातील स्त्रियांनी त्यांना नको म्हणून सांगितले, पण सुशिलाताईने पुन्हा सुपे घेता का, दुरड्या घेता का, असे मोठ्याने ओरडायला सुरुवात केली. करंदीकरानी आवाज ओळखला. ते बाहेर आले आणि सुशिलाताईने ती पत्रके त्यांच्या ताब्यात दिली. सुशिलाताईंच्या बाबतीत असे अनेक प्रसंग घडले आहेत.एकदा नागवाडी (गोपुली) गावात एका रात्री त्या थांबल्या होत्या. वेळ रात्री ११ ची होती. तेथेच त्यांचे दीर मनोहर दिवाण होते. त्यांना पकडण्यासाठी पोलीस आले. सुशिलाताईनी पोलिसांना सांगितले आमच्या खोलीत कोणी पुरुष नाही. आम्ही साऱ्या बायका आहोत. आम्ही तुम्हाला आत येऊ देणार नाही. पाहिजे तर तुम्ही बाहेर थांबा. सकाळी आम्ही बाहेर गेल्यावर तुम्ही बेलाशक खोलीची झडती घेऊ शकता आणि खरेच

पोलीस खोलीच्या दरवाजा समोर बसले. त्या खोलीला एक मागचे दार होते. तेथून मनोहर बाहेर निघून अंधारात दिसेनासे झाले. सुशिलाताईंबरोबर नामदेव नावाचा मुलगा होता. त्याला सुशिलाताईने स्वतःच्या हातातील बांगड्या घातल्या, कपाळाला मोठे कुंकू लावले, साडी नेसवली आणि सकाळी सकाळीच त्याला बाहेर काढले. एक तरुण मुलगी जाते आहे असेच पोलिसांना वाटले, नामदेव मात्र सुखरुप बाहेर पडला, सुशिलाताईने आपली बुलेटिन्स अंधरुणाखाली ठेवली होती. त्यावर लुगडे चोळी ठेवून त्या अंघोळीच्या तयारीत जाण्यास उभ्या राहिल्या. पोलिसांनी दरवाजा वाजवला. सुशिलाताईनी दार उघडले. पोलीस आत घुसले. खोलीत कोणीच नाही पाहून ते निघून गेले. असे अनेक प्रसंग त्यांच्यावर आले होते. एकदा तर बुलेटीनचे वाटप करताना पोलीस ज्या खेड्यात बुलेटीन वाटली जात होती तेथेच आले. बुलेटीन कशी लपवायची हा प्रश्न होता. पण सुशिलाताईंनी चटकन निर्णय घेतला आणि त्या संडासला म्हणून बाहेर पडल्या. त्या गावात चराचे संडास होते. सुशिलाताईने तेथील मातीच्या ढिगाऱ्याखाली बुलेटीन लपवून ठेवले. सगळ्या बाजूने व्यवस्थित माती लोटली आणि त्या बाहेर आल्या. पोलिसांना काहीच मिळाले नाही. असे अनेक बिकट प्रसंग घडले तरी त्या डगमगल्या नाहीत.१९४२ च्या चळवळीच्यावेळी कमलताई काकुडकर नेहमी त्यांच्याबरोबर असत. ज्या आश्रमात त्या राहत होत्या, तेथे पोलिसांनी कधीही धाड घातली नव्हती. कारण त्यांना तेथे काहीच मिळणार नव्हते. राष्ट्रसेवेचे काम अधिक महत्वाचे आहे. इथूनच राष्ट्र उभारणीची सुरुवात करायची आहे हे सर्व भगिनी जाणत होत्या. त्यामुळे त्यांनी आपले काम व्रत कधीही थांबवले नाही.

१९५६ पर्यंत सुशिलाताई सेवाग्राम आश्रमात होत्या त्यानंतर प्रभाकर मुंबईला खादीच्या कामासाठी आले. १९६१ मध्ये सुशिलाताई मुंबईत आल्या आणि आपल्या पतीला सहाय्यक म्हणून काम करू लागल्या. तेथील मगनवाडीत आल्या. तेथे कुंभारकाम शिकण्यासाठी व चरखा खादी याचे प्रशिक्षण घेण्यासाठी जे विद्यार्थी पर प्रांतातून येत होते त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी, हिशेबांची तसेच ऑफिसची कामे करण्याची जबाबदारी त्यांनी पेलली.

साऱ्या भारतातील अशा शाखांचा हिशेब व्यवस्थितपणे ठेवण्याचे काम सुशिलाताईंना करावे लागत असे. ते काम त्या निष्ठापूर्वक करत असायच्या. आयुष्याचे अखंड व्रत संभाळत जीवन कंठणे हे त्यांचे खरे जगणे होते!!

या सर्व वीरांगनांनी त्याग, धैर्य आणि देशप्रेमाचा आदर्श घालून दिला. त्यांच्या संघर्षामुळे भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. आज आपण मुक्त भारतात जगत आहोत, त्यामागे या शूर महिलांचे योगदान अमूल्य आहे.

स्वातंत्र्यासाठी लढलेल्या या नारींचे स्मरण करणे आणि त्यांच्या आदर्शांवर चालणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. त्यांच्या प्रेरणेतून देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि समाजसेवेची भावना आपल्या मनात सदैव जागृत राहिली पाहिजे

**– वैदेही जोशी,** मोबा. ९५४५६३५४६५


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

**सराफी दुकान**

**मंगळवार दि. ८ : पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर**

**0231-2546585**

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक आठ)**

शेरसी हे गाव केदारनाथपासून अंदाजे १५ किलोमीटर दूर आहे. मी सकाळी सात वाजता तयार झालो. श्री प्रकाश यादव यांच्या साथीदारांनी मला पोळी भाजीचा डबा दिला. तो घेऊन मी रस्त्यावर येऊन गाडीची वाट पाहत उभा राहिलो. थोड्या वेळाने एका मोटरसायकल स्वाराने मला सीतापुर येथे सोडले. तिथून मी साडेआठ वाजता सोनप्रयाग, गौरीकुंड येथे गेलो. सोनप्रयाग येथून एक पूल ओलांडल्यावर गौरीकुंड येथे जाण्यासाठी जीप (वडाप) मिळतात. गौरीकुंड येथे चौकीवरती नोंद करावी लागते व तुमचे आधार कार्ड तपासले जाते, ते सर्व झाल्यावर सकाळी ९.०० वाजता मी केदारनाथ चढण्यास सुरुवात केली. गौरीकुंड ते केदारनाथ मंदिर हे अंतर १६ किलोमीटर आहे. रस्ता फार अरुंद व नागमोडी चढाईचा आहे. त्या अरुंद रस्त्यावरून चालणारे यात्रेकरू, घोडेवाले, डोलीवाले, बास्केटवाले व पिट्टू हे सर्वच ये जा करत असतात त्यामुळे गर्दी होते व वेग मंदावतो. वाटेत थोड्या थोड्या अंतरावर किलोमीटरचे फलक लावलेले आहेत व भीमबली, छोटी चिचली, बडी चिचली अशी काही विसाव्याची ठिकाणे आहेत. माझ्या पाठीवर सॅक व हातात दंड घेऊन मी चाललो होतो. मध्येच घोडेवाले किंवा बास्केटवाले विचारत होते. मी त्यांना नम्रपणे नकार देऊन पुढे चालत राहिलो. मुखाने नामस्मरण सुरू होते. श्री गोंदवलेकर महाराजांनी सांगितल्याप्रमाणे नामस्मरण सुरू असले की सर्व विषय मागे पडतात व नामस्मरण थांबले की सगळीकडे विषयच विषय दिसतात. त्याप्रमाणेच नाम चालू असले की दम लागणे, पाय दुखणे हे काही आठवायचे नाही आणि नाम थांबले की सर्वांग दुखायचे असे करत दुपारी अडीच वाजता म्हणजे चालायला सुरू केल्यापासून अवघ्या साडेपाच तासात मी केदारनाथ मंदिर जवळ पोहोचलो. केदारनाथची समुद्रसपाटीपासूनची उंची ही ११८०० फूट आहे. तिथे पोहोचल्यावर अक्षरशः आभाळ ठेंगणे भासू लागते. मी घरी, ऑफिसमध्ये व काही मित्रांना व्हिडिओ कॉल करून मंदिर दाखवले व मीही मंदिरात जाऊन दर्शन करून आलो. मंदिराच्या मागे असलेली भीमशीळा व शंकराचार्यांच्या समाधीचे दर्शन घेतले आजूबाजूचा परिसर पाहिला मंदिराच्या डाव्या बाजूच्या टेकडीवर भैरवनाथ मंदिर व उजव्या बाजूस टेकडीवर माताजी मंदिर व मोदी गुफा आहे. मंदिरापासून थोड्या अंतरावर असलेल्या बाबा बर्फानी यांच्या आश्रमात गेलो व तिथे राहण्याची परवानगी घेऊन माझ्याकडचे सामान तिथेच ठेवून मंदिरातील आरतीला हजर राहिलो, रात्री सात ते आठ या वेळेत भव्य आरती होते. ते सर्व मनात व डोळ्यात साठवून पुन्हा आश्रमात आलो. तेव्हा तिथे भजन चालू होते. तिथे भजनाचा आनंद घेतला व रात्री भोजन करून झोपी गेलो. त्या परिसरात कडाक्याची थंडी होती अंगात थर्मल जॅकेट, स्लीपिंग बॅग व त्यावर ब्लँकेट घेऊन सुद्धा थंडी सहन होत नव्हती. सकाळी थोडं उशिरा उठलो. अन्हिक उरकले व मंदिरामध्ये पुन्हा दर्शनाला गेलो. पहाटे चार वाजल्यापासून दुपारी बारा वाजेपर्यंत स्पर्श दर्शन होते व त्यानंतर लांबून दर्शन घेता येते. छान दर्शन झाले. तिथेच गर्भगृहामध्ये शंखनाद केला व बाहेर आलो पुन्हा एकदा भीमशीळा, शंकराचार्य समाधी दर्शन घेतले अभिषेक पावती केली व सकाळी अकरा वाजता परतीचा प्रवास सुरू केला, मंदिरामध्ये वारणानगर नवे पारगाव येथील श्री. प्रकाश घाडगे भेटले त्यांनी पोळी भाजी खाण्याचा आग्रह केला. त्यामुळे त्यांच्याबरोबर भोजन करून उतरायला

**पान १९ वर पहा...**

# कल्पक्कमची कमाल !

कल्पक्कमने संपूर्ण जगाला थक्क केले आणि भारताकडे पाहण्यास भाग पाडले! प्रत्येक भारतीयाने अभिमानाने आपली मान उंच करावी, अशी ही ऐतिहासिक कामगिरी आहे! आपण सहसा सोशल मीडियावर चित्रपटांचे प्रदर्शन किंवा क्रिकेटपटूंच्या यशाचा मोठा उत्सव साजरा करतो. पण आपल्या भविष्याला एक नवी दिशा देणारा एक प्रचंड, खऱ्या आयुष्यातील चमत्कार चेन्नईपासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर असलेल्या कल्पक्कम येथे अत्यंत शांततेत घडला आहे.

होय! २६ जून २०२६ रोजी भारताने जागतिक वैज्ञानिक इतिहासात एक सुवर्ण अध्याय लिहिला आहे. अमेरिका आणि फ्रान्ससारख्या महासत्तांनी अब्जावधी डॉलर्स खर्च केले आणि शेवटी हे आमच्याकडून होणार नाही असे म्हणून हात टेकले. पण आपल्या भारतीय शास्त्रज्ञांनी हे आव्हान पेलले आणि स्वतःच्या बळावर ते साध्य करून दाखवले. ही कामगिरी केवळ यंत्रांचा विजय नाही; हा भारताचा स्वाभिमान आणि आपल्या शास्त्रज्ञांच्या अनेक दशकांच्या तपस्येचे फळ आहे. प्रत्येक भारतीयाला या कामगिरीबद्दल माहिती का असायला हवी? कारण ही आपल्या पुढील पिढ्यांच्या सुरक्षित भविष्याची हमी आहे.

चला, कल्पक्कममध्ये नक्की काय साध्य झाले आहे ते सोप्या भाषेत समजून घेऊया. कधीही न संपणारे 'अक्षय पात्र'(प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिएक्टॉर) ६ एप्रिल २०२६ रोजी, कल्पक्कम येथील PFBR अणुभट्टने (Nuclear Reactor) आपले पहिले 'क्रिटिकॅलिटी' (Criticality) – म्हणजेच शाश्वत अणु साखळी प्रक्रिया (sustained nuclear chain reaction) यशस्वीरित्या साध्य केली. ही जागतिक पातळीवरील एक फार मोठी कामगिरी आहे.

**हे इतके खास का आहे?** एका सामान्य अणुभट्टीची तुलना लाकडाच्या चुलीशी करा. जर तुम्ही त्यात १ किलो लाकूड टाकले, तर ते जळते, उष्णता देते आणि त्याची राख होते. पण आमच्या शास्त्रज्ञांनी कल्पक्कममध्ये बांधलेली 'फास्ट ब्रीडर रिएक्टॉर' ही एका 'अक्षय पात्र चुलीसारखी' आहे!

जर तुम्ही यात १ किलो इंधन टाकले, तर ते तुम्हाला हवी असलेली वीज तर देईलच, पण त्यासोबत १.२ किलो नवीन इंधन देखील तयार करेल! म्हणजेच, हे इंधन वापरण्यापेक्षा जास्त इंधन तयार करते. हे ऐकायला एखाद्या जादूसारखे वाटते ना? पण हे पूर्णपणे सत्य आहे!

**आपल्या मातीची संपत्ती, आपल्या हाती – थोरियमचे स्वप्न :** भारताकडे अणू इंधन म्हणून वापरण्यासाठी युरेनियमचा साठा खूप कमी आहे. त्यामुळे आपल्याला परकीय देशांवर अवलंबून राहावे लागते. पण 'थोरियम' हे खनिज केरळ आणि तामिळनाडूच्या समुद्रकिनाऱ्यावरील वाळूत मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. खरे तर भारताकडे जगातील सर्वात मोठा थोरियमचा साठा आहे!

**डॉ. होमी भाभा आणि डॉ. अब्दुल कलाम यांचे हेच स्वप्न होते :** आपल्याला वीज निर्मितीसाठी आपल्याच मातीतील थोरियमचा वापर करावा लागेल. कल्पक्कमच्या या यशाने त्या महान स्वप्नाचे दरवाजे उघडले आहेत. आता इथून पुढे आपल्याला विजेसाठी कोणत्याही परदेशी देशासमोर हात पसरण्याची गरज नाही. पुढील ३०० वर्षांपेक्षा जास्त काळ भारताला लागणारी संपूर्ण वीज आपण स्वतः निर्माण करू शकतो!

**जगाला थक्क करणारी ग्रीन हायड्रोजनची कामगिरी :** आता येऊया त्या मोठ्या चमत्काराकडे जो २६ जून रोजी घडला. कल्पक्कम येथे जगातील पहिल्या 'अणुऊर्जेवर चालणाऱ्या हायड्रोजन उत्पादन प्रकल्पाचे' (Nuclear-powered Hydrogen Production Plant) उद्घाटन करण्यात आले आहे.

**हायड्रोजन का महत्त्वाचा आहे?** हायड्रोजन हे भविष्यातील इंधन आहे. पेट्रोल, डिझेल आणि कोळसा जाळल्याने काळा धूर निघतो आणि पर्यावरणाची हानी होते. पण जेव्हा हायड्रोजनचा इंधन म्हणून वापर केला जातो, तेव्हा शेवटी बाहेर पडणारी एकमेव गोष्ट म्हणजे 'शुद्ध पाणी'!

पण यात एक मोठी अडचण होती. हे स्वच्छ हायड्रोजन तयार करण्यासाठी आपल्याला पाणी (H2O) वेगळे करावे लागते. त्यासाठी प्रचंड विजेची गरज असते. आणि ती वीज तयार करण्यासाठी आपल्याला पुन्हा

कोळसाच जाळावा लागत होता! म्हणजे हे घर स्वच्छ करण्यासाठी कचरा घरात आणण्यासारखे होते.

**आमच्या शास्त्रज्ञांचा विलक्षण तोडगा :** IGCR, कल्पक्कम येथील शास्त्रज्ञांनी यावर एक भन्नाट मार्ग शोधून काढला. अणुभट्टीत वीज तयार करताना बाहेर पडणारी प्रचंड उष्णता वाया घालवण्याऐवजी, त्यांनी 'कॉपर-क्लोरीन सायकल' (Copper-Chlorine Cycle) वापरून पाणी थेट गरम करण्यासाठी आणि हायड्रोजन वेगळा करण्यासाठी तिचा वापर केला.

याचा अर्थ असा की, कोणतेही प्रदूषण न करता आणि वातावरणात कार्बनचा एकही थेंब न सोडता, भारताने अणुऊर्जेचा वापर करून जगातील सर्वात स्वच्छ हायड्रोजन तयार केला आहे आणि जगाला नवा मार्ग दाखवला आहे.

आज आंतरराष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञही हे पाहून थक्क झाले आहेत आणि भारताचे कौतुक करत आहेत. आगीशी खेळणारे 'मूक नायक' ! (Silent Heroes)

हे यश एका रात्रीत मिळालेले नाही. सामान्य अणुभट्ट्या उष्णता कमी करण्यासाठी पाण्याचा वापर करतात. पण या फास्ट ब्रीडर रिएक्टॉरमध्ये कूलंट (थंड ठेवणारा पदार्थ) म्हणून 'लिक्विड सोडियम' (द्रवरूप सोडियम) या धातूचा वापर करावा लागतो.

तुम्हाला माहीत आहे का सोडियम किती धोकादायक आहे? तो हवेच्या संपर्कात आला की पेट घेतो आणि पाण्याचा स्पर्श झाला की त्याचा स्फोट होतो! अशा धोकादायक द्रवरूप धातूला हाताळणे हे जादूच्या प्रयोगापेक्षाही कठीण आहे. अनेक परदेशी देश या धोक्याला घाबरले आणि त्यांनी आपले संशोधन बंद केले.

**पण आमचे भारतीय शास्त्रज्ञ?** त्यांनी अनेक दशके रात्रंदिवस मेहनत घेतली, विचार केला आणि या लिक्विड सोडियमला एखाद्या लहान मुलासारखे सुरक्षितपणे हाताळण्याचे स्वदेशी तंत्रज्ञान विकसित केले आणि ते यशस्वी करून दाखवले !

ज्या अज्ञात शास्त्रज्ञांनी आपले संपूर्ण आयुष्य यासाठी समर्पित केले, त्यांच्या चरणी आपण सर्वांनी नतमस्तक झाले पाहिजे !

**याचा आम्हा सामान्य लोकांना काय फायदा होईल?**

**अतिशय स्वस्त वीज :** आता कोळशाच्या टंचाईची चर्चा कधीच होणार नाही. संपूर्ण भारताला अखंड आणि परवडणारी वीज मिळेल !

**आर्थिक विकास :** आखाती देशांमध्ये युद्ध झाले तरी पेट्रोलचे भाव वाढतील अशी भीती आता आपल्याला राहणार नाही. आपले स्टील आणि खत यांसारखे मोठे उद्योग आपल्याच हायड्रोजन इंधनावर चालतील !

**पान १९ वर पहा...**

**दिनविशेष सप्टेंबर २०२६ पराभवनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्रावण-भाद्रपद १९४८** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**




**मंगळवार दि. १ :** श्री टेंबेस्वामी जयंती, **शुक्रवार दि. ४ :** श्रीकृष्ण जन्माष्टमी, ज्ञानेश्वर माऊली जन्माष्टमी, **शनिवार दि. ५ :** शिक्षक दिन, गोपाळकाला, **रविवार दि. ६ :** श्रीकृष्ण सरस्वती महाराज पुण्यतिथी, **गुरुवार दि. १० :** दर्श पिठोरी अमावास्या, **सोमवार दि. १४ :** गणेश चतुर्थी, हरितालिका तृतीया, **मंगळवार दि. १५ :** श्री गजानन महाराज पुण्यतिथी, ऋषि पंचमी, **गुरुवार दि. १७ :** ज्येष्ठा गौरी आवाहन, **शुक्रवार दि. १८ :** ज्येष्ठा गौरी पूजन, **शनिवार दि. १९ :** ज्येष्ठा गौरी विसर्जन, घरगुती गणेश विसर्जन, **सोमवार दि. २१ :** रामकृष्ण परमहंस पुण्यतिथी, **शुक्रवार दि. २५ :** अनंत चतुर्दशी, सार्वजनिक गणेश विसर्जन, **रविवार दि. २७ :** महालयारंभ, **बुधवार दि. २९ :** अंगारक संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ८.१२ वा.).

शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

**(लेखांक त्रेचाळिसावा)**

दुसरे दिवशी सकाळी जनाबाई अंगणात सडा घालत होत्या. अजून सूर्यनारायण यायचे होते. वातावरणात नीरव शांतता होती. जनाबाईच्या सडा मारण्याचा सप्-सप् असा आवाज त्या शांततेला छेदत होता आणि अचानक मंदिरातून ॐ कार ध्वनी ऐकू यायला लागला. हळूहळू त्या ध्वनीची तीव्रता वाढली. अवघ्या वातावरणात तो ॐकार नाद भरून राहिला. लोकांची पावलं आपोआपच मंदिराकडे वळली. मंदिराच्या गर्भागारात निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ता पद्मासनं घालून बसले होते. गर्भागारात तेवणाऱ्या समईच्या मंद प्रकाशाची प्रभावळ चौघांच्या चेहऱ्यांभोवती पसरली होती. ध्वनीची स्पंदनं वाढली, की ती समईची ज्योत थरथरायची. तिची आभा मागे-पुढे व्हायची आणि त्या हलणाऱ्या प्रकाशात विठूच्या सावळ्या चेहऱ्यावर भाव उमटल्यासारखे दिसायचे. कितीतरी वेळ हा छाया-प्रकाशाचा आणि ध्वनिस्पंदनांचा खेळ चालला होता. मंदिरात जमलेले लोक अनिमिष नेत्रानं हे सारं पाहत होते. बघता-बघता सारी आवर्तनं संपली. शांतिपाठ म्हणून झाला आणि पांडुरंगाला साष्टांग दंडवत घालून चौघं जण बाहेर आले. बाहेर आल्यावर लोकांनी चौघांना प्रणाम केला. चौघांनी तिथं जमलेल्यांना वंदन केलं. मंदिराचा सभामंडप भरून गेला होता. गर्भागाराच्या दाराशी चौघं जण पद्मासन घालून बसले.

अचानक ज्ञानादादानं बोलायला सुरुवात केली, ''लोकहो, आजची सकाळ मोठी प्रसन्न आहे. आज जाग आल्याबरोबर आम्हाला पांडुरंगाचं दर्शन झालं. या प्रसन्नतेला द्विगुणित करण्यासाठी आमचा सोपान आणि तुमचा सोपानकाका आता नमनस्तोत्र सांगणार आहे. मी काय बोलतो, कसं बोलतो, ते तुम्ही अनुभवलेलं आहेच. आता आमचा सोपान किती सुंदर आणि नेमकं बोलतो, ते अनुभवा. सोपाना, सांगतोस नमनस्तोत्र ? मंडळी तुझी प्रतीक्षा करताहेत.'' ज्ञानादादानं एकदम असं सांगितलं आणि क्षणभर सोपान बावरलाच. त्याच्या लक्षात आलं, निवृत्तीदादा आणि ज्ञानादादा दोघं मिळून आपली चाचपणी करताहेत, परीक्षा घेत आहेत. त्यानं एक क्षण नजर उचलून निवृत्तीदादाकडे पाहिलं. त्याच्या डोळ्यांत आदेश होता, विश्वास होता आणि अभिमानही. निवृत्तीदादाने हलकेच मान लववली. सोपानानं त्याची आज्ञा शिरसावंद्य मानली. त्यानं तिथूनच निवृत्तीदादाला, ज्ञानादादाला नमस्कार केला. मागे वळून विठुरायाला वंदन केलं. क्षणभर डोळे मिटले. पद्मासन घातलं. हात जोडले. दीर्घ श्वास घेतला. एकवार डोळे उघडून समोर उत्सुकतेनं बसलेल्या श्रोतृवर्गालाही वंदन केलं आणि बोलायला सुरुवात केली –

''माय-पित्यांनो, निवृत्तीनाथांचा शिष्य आणि ज्ञानादादाचा धाकटा भाऊ मी सोपानदेव आपल्याला विनम्र वंदन करतो ! साक्षात ज्ञानसूर्य असं ज्याचं नामोनिधान आहे. आणि श्रेष्ठ गुरू अशी ज्याची योग्यता आहे, त्या ज्ञानादादा आणि निवृत्तीदादाच्या आज्ञेवरून मी नमनस्तोत्र गुंफण्याचा एक केविलवाणा प्रयत्न करणार आहे. अजाण बालक समजून माझे विचार चुकले, तरी पोटात घाला आणि तुमच्यासमोर मी धाडसानं शब्दकळा मांडू शकेन, असा मला आशीर्वाद द्या!'' अत्यंत भावुक आवाजात, लाघवी शब्दांत श्रोत्यांना अशी विनवणी करून सोपान क्षणभर थांबला. एकवार डोळे मिटले आणि हळुवार आवाजात त्यानं नमनस्तोत्राला सुरुवात केली.

**नमो ज्योतिर्मय ब्रह्मा। आनंद ईश्वर पुरातना।**
**नमो नारायणा कमळ कोंदणा। नमो नमो स्वामिया।।**

**नमो सद्‌गुरु निवृत्ती। नमो रखुमाईच्या पती।**
**नमो ज्ञान मूर्ती। अगम्या पुरुषा।।**
**नमो भक्ती मुक्ती चैतन्य माया। नमो हर्ता कर्ता काया।**
**नमो आदि पुरातन माया । परब्रह्मा ।।**
**नमो विराट पुरुषा पुरातना। नमो जगज्जीवना करुणाघना, चराचर पालका गहना। माझिया।।**
**नमो ब्रह्मांड व्यापका । नमो गुणातीत मातांका ।**
**चुकवी जन्ममरण एका । तारी विश्व अंगे ।।**
**नमो जळस्थळ रक्षिता । आदि अवसानी तारिता ।।**
**नमो रोमारोम अव्यक्ता । नमो नमो दीन बंधू ।।**
**नमो विराट महद्‌ब्रह्मा। निष्कलंक समुद्रमा।**
**योगियांच्या सुखधामा। नमोनमो दयाळा ।।**
**औट हाती ध्वनी । नमो नमो अंत:करणी ।।**
**नमो सत्रावी त्रिवेणी । त्रिपुटी जेथे ।**
**नमो विटेवरी सदटा । नमो वैकुंठीचिये पीठा ।**
**आदिअंती एकटा । नमो आदिपुरुषा ।।**
**आदिअंती शेवटी । सहस्त्रदळी गुह्य पीठी ।।**
**नमो उघडी दृष्टी । स्वरूपी तुझ्या ।।**
**नमो पायी घडली मिठी । नमो बांधिली हृदयी गाठी ।।**
**साठवी पोटी । गुणदोष स्वामी ।।**
**नमो गेले आले । नमो झाले ते झाले ।**
**नमो तुझे त्वां केले । सांभाळुनि ।।**
**ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।**
**रामकृष्ण हरी। रामकृष्ण हरी।।**

सोपानानं शांतिपाठाचा उच्चार केला. नमनस्तोत्र पूर्ण झालं होतं. रामकृष्ण हरीचा गजर झाला. सोपानानं जोडलेले हात सोडले. गुडघ्यावर मुद्रा स्थितीत ठेवले. दीर्घ श्वास घेतला, डोळे उघडले. सर्वप्रथम त्याची नजर श्रोतृवर्गावर पडली.

सगळ्यांचे डोळे मिटलेले होते. हात जोडलेले होते. 'रामकृष्ण हरी'च्या गजरात सगळी तल्लीन झाली होती. सगळ्यांची जणू भावसमाधी लागली होती. एक क्षणभर सोपानाची नजर त्या श्रोतृवर्गावर खिळली. तोच एक अलगद निःश्वास त्याला ऐकू आला. त्या अस्पष्ट आवाजासरशी सोपानानं मान वळवली आणि त्याच्या नजरेनं निवृत्तीदादाचा मागोवा घेतला. निवृत्तीदादाच्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती, समाधान होतं, डोळ्यांत अपेक्षापूर्तीचा आनंद होता. आपल्या धाकट्या भावाबद्दल कौतुक होतं, तर लाडक्या शिष्याबद्दल अभिमान होता. आपला शिष्य कसोटीला उत्तमरीत्या उत्तरला याची पावती त्यांच्या डोळ्यांतून वाहणारा प्रत्येक अश्रूचा थेंब देत होता. सोपानाची नजर निवृत्तीदादाच्या नजरेला भिडली, क्षणभरच! पण त्या एका क्षणात मातृत्वाच्या, वात्सल्याच्या, कोडकौतुकाच्या, शाबासकीच्या सहस्त्र धारा आपल्या अंगावर वर्षत आहेत, दादाच्या प्रेमाचं प्रोक्षण आपल्यावर करताहेत, गुरूच्या अभिमानानं दिलेल्या शाबासकीच्या तीर्थजलाचं सिंचन आपल्यावर होतेय आणि या सर्वांच्या वर्षावात आपण न्हाऊन निघतोय, असं त्या एका क्षणात सोपानाला वाटून गेलं आणि धन्यता कशाला म्हणतात, कृतार्थता म्हणजे काय, याची एक प्रसन्न जाणीव त्या क्षणानं त्याला करून दिली. निवृत्तीदादाच्या शेजारी ज्ञानादादा बसला होता. त्या क्षणी सोपानाला तो साक्षात ज्ञानसूर्य भासला; पण त्याच्याही डोळ्यांत सोपानाबद्दलचा अभिमान ओसंडून वाहत होता. इतका, की तो अभिमान अश्रुरूपानं आपल्या डोळ्यांतून ओघळतोय आणि गालांवरून वाहतोय, याचंही त्याला भान नव्हतं. 'परवा-परवापर्यंत आपल्याला एकसारखे प्रश्न विचारून भंडावून सोडणारा, लहानसहान गोष्टींवरून मुक्तीशी भांडणारा, तिच्या खोड्या काढणारा आणि त्याच वेळी आईच्या मायेनं तिचा सांभाळ करणारा हा सोपान आज साक्षात सरस्वतीच्या मुखातून स्रवाव्यात, तशा नमनस्तोत्राच्या ओव्या रचतो आणि गातो... आपल्याला असं का होतंय,' हे ज्ञानादादाला उमगत नव्हतं; पण गळ्यात काहीतरी प्रचंड दाटून आलंय आणि ते बाहेर पडायला धडपडतंय एवढंच त्याला जाणवत होतं. मुक्तानं मात्र ज्ञानादादाचा हात घट्ट धरला होता. आपल्या मनात, हृदयात उचंबळणाऱ्या भावना त्या घट्ट हातात आपल्याला धरून ठेवता येतील, अशी एक भाबडी समजूत तिची असावी. कारण आपल्या डोळ्यांतून

नुसतेच घळघळा अश्रू वाहत नाही, तर आपण चक्क हुंदके देतो आहोत, याचंही तिला भान नव्हते. नामदेवांनी भानावर येऊन विठ्ठल विठ्ठलचा गजर केला आणि लोक पांगले.

आता सभामंडपात होते निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता आणि नामदेव. अर्थात या सगळ्या अनुपाचा प्रमुख साक्षीदार होता, तो सावळा विठ्ठल. नामदेवांनी पाहिलं, विठ्ठलाच्या मुखावरही अतिप्रसन्न हास्य होतं. जणू कुणीतरी अपरंपार कौतुकानं त्याची आराधना केली असावी. काही क्षण तसेच स्तब्धतेत गेले. कुणीच काही बोललं नाही. कुणालाच काही बोलायचं भानच नव्हतं. यातून प्रथम भानावर आली मुक्ता. डोळे पुसून ती म्हणाली, ''सोपानदादा, आता आज तुझी दृष्ट काढायची वेळ माझी आहे. मी परवा ताटीचे अभंग केले आणि ज्ञानादादाची समजूत काढली तेव्हा तू माझी दृष्ट काढली होतीस. आज मी तुझी दृष्ट काढणार आहे.'' तिच्या म्हणण्याला दुजोरा देत ज्ञानादादा म्हणाला, ''यथायोग्य मुक्ते! तू अगदी योग्य बोललीस! आज खरोखरच सोपानानं दृष्ट लागण्यासारखी कामगिरी केली आहे. खरंच! त्याची घरी गेल्यावर आज तू दृष्ट काढ.'' ज्ञानादादाचं बोलणं ऐकून सोपान संकोचला, पण निवृत्तीदादाने वेगळंच सांगितलं. म्हणाला, ''सोपाना, तू रचलेलं हे नमन स्तोत्र अर्थाच्या दृष्टीनं उत्तम आहे. पण शब्दरचनेच्या दृष्टीनं त्यात अजून नेमकेपणा यायला हवा. शब्दरचना अजूनी बांधेसूद आणि आटोपशीर हवी. साडेतीन ओवीची रचना तू जर करणार असशील तर साडेतीन ओवीची नेटकी रचना व्हायला हवी. पहिली ओळ मोठी किंवा लहान किंवा दुसरी ओळ लहान आणि तिसरी ओळ अधिक मोठी असं करून ओढून ताणून ती ओवी साडेतीन मात्रेची अशी रचना असून योग्य नाही. तुझ्याकडे शब्दप्रभुत्व आहे. भाषाप्रभुत्व आहे. नेमकी रचना करायला शीक. खूप छान रचना करशील!'' निवृत्तीदादाचं बोलणं गुरुला शोभेल असंच होतं. ते ऐकून सोपानालाही आनंदच झाला. आपला दादा आपल्याला प्रत्येक क्षणी मार्गदर्शनासाठी सिद्ध आहे याचा फार मोठा दिलासा त्याला मिळाला. नामदेव मात्र या भावंडाचं हे कौतुक नवलाईनं न्याहाळत होता. प्रसंगी भावंडं, प्रसंगी गुरु आणि प्रसंगी माता-पिता अशा अनेक भूमिका ही सगळे जण एकमेकांसाठी करत होते. नव्हे, जगत होते आणि याचंच त्याला मोठं अप्रूप वाटत होतं !

तो दिवस असा सगळा अप्रुपाचा, कौतुकाचाच होता. भागवत धर्माची प्रतिष्ठापना झाल्यामुळे समाजात, विशेषतः बहुजनसमाजात फार मोठी क्रांती होणार होती. सूर्यनारायण हळूहळू माथ्यावर येऊ लागला होता. गावातली अनेक प्रतिष्ठित मंडळी नामदेवांच्या वाड्यासमोर जमली. आता भागवत धर्माचं पुढचं उद्दिष्ट ठरवायचं होतं. त्या दृष्टीनं योजना आखण्याची जबाबदारी ज्येष्ठ या नात्यानं आणि गुरु या जबाबदारीनं निवृत्तीदादांवर होती. त्यानं बोलायला सुरुवात केली. ''माय-बाप-बंधू-सखा-मित्र हो! काल भागवत धर्माची प्रतिस्थापना झाल्यावर आता आपलं उद्दिष्ट आणि उद्दिष्ट-पूर्तीसाठीची योजना यांचा विचार करायचा आहे. भागवतधर्माचं स्वरूप मुळातच आपण सर्वसमावेशक असं स्थापित केलं आहेच; पण त्याला सर्वव्यापक असं रूप देण्यासाठी याचा सर्व दूर प्रचार आणि प्रसार व्हायला हवा. यासाठी संकोचितपणा सोडून आपल्याला तीर्थाटन करावं लागेल. दूरदूरच्या तीर्थस्थळांना भेटी देऊन तिथे, त्या-त्या ठिकाणी भागवत धर्माचा प्रसार करावा लागेल. त्याची समग्र माहिती सांगावी लागेल. भागवत धर्म प्रतिस्थापित झाल्यानंतर त्याचा सर्वदूर प्रचार आणि प्रसार हेच आपलं उद्दिष्ट असेल. ध्येय असेल. तेव्हा सर्वप्रथम तीर्थाटनाची योजना अमलात आणायला हवी. तेव्हा आपण सर्व जण तीर्थाटनाला जाण्यासाठी तयार होऊ या.'' निवृत्तीदादाच्या या बोलण्यानं सर्वांनाच आनंद झाला आणि त्याच्या तीर्थाटनाला जाण्याच्या योजनेला सर्वांनी संमती दिली. एखादा चांगलासा दिवस बघून प्रस्थान करायचं असा बेत नक्की करून मंडळी घरी परतली.

(क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले**, मोबा. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे.

**– व्यवस्थापक**

अध्याय १० – **विभूतियोग**

**ऐसे निरंतर भक्तियुक्त । जे मज भजती प्रीति युक्तीनें अत्यंत । तयासी योगज्ञान देईन बहुत । सत्य जाण पार्था ।।**

असे जे रंगले नित्य भजती प्रीति–पूर्वक ।
त्यांस मी भेटवी माते देउनी बुद्धि–योग तो । ।।१०।।

**तया उपजलिया अज्ञान अंधकारु । त्यावरी कृपा करी मी करुणाकरु । ज्ञानदीप होउनी सोज्वळ निरंतरु । अज्ञान नासी तयाचें ।।**

करूनि करुणा त्यांची हृदयी राहुनी स्वयें ।
तेजस्वी ज्ञान–दीपानें अज्ञान–तम घालवी ।।११।।

**अर्जुन उवाच ।**

**अर्जुन म्हणे गा परब्रह्म । पवित्र परिकरा परम धामा । श्री सत्य पुरुषा शाश्वत या नामा । आदि देवा नित्य प्रभु तूं ।।**

पवित्र तूं पर–ब्रह्म थोर तें मोक्ष–धाम तूं ।
आत्मा नित्य अ–जन्मा तूं विभु देवादि दिव्य तूं ।।१२।।

**जे मज सांगितले ऋषेश्वरी सर्वी । देवऋषि नारदादि देवीं । असीत देवळे व्यासादिक स्वभावी । तेचि मज प्रीति सांगतोसी ।।**

ऋषि एक–मुखें गाती तसे असित देवल ।
व्यास नारद देवर्षि तूं हि आपण सांगसी ।।१३।।

**सर्वही मज तुवां सांगितले । तितुके मज प्रत्यया येउनी साच मानलें । भगवंता तुझे प्रत्यक्ष रूप प्रगटलें । तें न कळे दैत्यादानवासी ।।**

मानितो सत्य हे सारे स्वये जे सांगसी मज ।
देव दान कोणी हि तुझे रूप न जाणती ।।१४।।

**तूं आप आपणा आणसी पुरुषोत्तमा । भूतभावन भूतेषा तुझा न कळे महिमा । देवाचा देव तुज म्हणती परमात्मा । जगाचा स्वामी तूं ।।**

जाणसी तें तुझे तू चि प्रत्यक्ष पुरुषोत्तमा ।
देव–देवा जगन्नाथा भूतेशा भूत–भावना ।।१५।।

**समस्त देव तुझिया विभूति । आपलिया सांग पा मजप्रति । जे ही विभूति गा श्रीपति । त्रिभुवन व्यापुनी आहे सी तूं ।।**

विभूति आपुल्या दिव्य मज नि:शेष सांग तूं ।
ज्यांनी हे विश्व तू सारे राहिलास भरूनियां ।।१६।।

**योगेश्वरा तुझे चिंतन करिता । तुज कैसिया रीति जाणो गा अनंता । तुझें ध्यान कोणे स्थळी करुं आता । हे भगवंता सांग मज ।।**

योगेश्वरा कसें जाणूं चिंतनीं चिंतनी तुज ।
कोण्या कोण्या स्वरूपात करावे ध्यान मी तुझे ।।१७।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

# मुलांचे पान



## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# मनाला खुपणारं कागदावर
# पालकत्त्व
## (लेखांक १४)

आजकाल तरुण, खरं म्हणजे अल्पवयीन मुलांकडून समाजात वावरताना त्यांच्याकडून घडणारं वर्तन पाहून मन अस्वस्थ होतं. चोरी, खून, अत्याचार अशा गुन्ह्यांमध्ये त्यांचा होणारा सहभाग मनात खुपत राहतो. त्यांच्याकडे घरातील वडिल माणसांकडून, आई-वडलांकडून पुरेसं लक्ष दिलं जात नाही कां असा विचार मनात सलत राहतो. अशा घटना घडण्याचे प्रमाण अत्यल्प असले तरी संवेदनशील व्यक्तींचे मन चिंतातूर करण्यास त्या पुरेशा असतात. त्यामुळेच पालकत्व या विषयावर काहीतरी लिहावे असे वाटले.

पशू, पक्षी, प्राणी यांनाही पालकत्त्वाची जबाबदारी पार पाडावी लागते. पण पिलाच्या पंखात बळ आलं की, प्राण्याचा बछडा आपल्या पायावर उभा राहू लागला की, किंवा पशूचा बछडा शिकार करू लागला की या सर्वांची पालकत्वाची जबाबदारी संपते. पण माणसाचं तसं नाही. त्याचं मुल वर्ष-दीड वर्षाचं झालं, आपल्या पायावर चालू लागलं, इतरांशी बोलून चालून मिसळू लागलं की खऱ्या अर्थानं पालकत्त्वाची जबाबदारी सुरुवात होते. आपल्या मुलाचे शिक्षण ही पाकलांची जबाबदारी असते. ती दुसऱ्या कुणावर सोपवता येत नाही. शाळेत आपल्या पाल्याचा सदैव पहिला नंबर आलाच पाहिजे याविषयी अनेक पालक आग्रही असतात. चुकून पहिल्याच्या ऐवजी दुसरा नंबर आला तर आकाशपाताळ एक करून आपल्या पाल्यावर अभ्यासाविषयी सूचनांचा भडिमार करतात. ही मुलं विचित्र दबवाखाली येतात. त्यांचं वागणं बदलू लागतं. पाळण्याच्या स्थितीतील मूल जितके सुंदर तितके ते अथांग कोडेही असते. कालपर्यंत सुतासारखे सरळ वागणारे मूल एकाएकी उदास आणि अबोल होऊ लागते. मुलगी एकाएकी चिडचिडी होऊ लागते. अभ्यासात हुशार मूल सर्वसाधारण होतं. हे सारे समजून घ्यायला, उत्तर मिळवायला आजकाल अनेक पालकांकडे वेळच नसतो.

बोर्डाची गुणवत्ता यादी ही एक यादी असते. एकमेव यादी नसते. इतर कितीतरी क्षेत्रात मुले नैपुण्य मिळवू शकतात हे ध्यानात घेतले पाहिजे. शाळेत नंबर आला पाहिजे या पालकांच्या अट्टाहासापायी ज्यांचा नंबर येत नाही ती मुले खट्टू, उदास राहतात, तर ज्यांचा नंबर येतो त्या मुलांच्यावर नंबर टिकवला पाहिजे या भावनेची टांगती तलवार राहते. या दोन्हीही बाबतीत मुले गैरसमार्गाकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. शाळा हे हसतं-खेळतं बालपण गाडून टाकण्याचे ठिकाण आहे का? याचा पालकांनी विचार करणे आवश्यक आहे.

ही मुलांची सर्वात पहिली आणि महत्त्वाची शाळा असते. घराच्या चार भिंतीत सुरक्षित वातावरणात आई-बाबा, सुदैवाने असले तर आजी-आजोबा आणि एखादं भावंड याबरोबर वाढताना प्रेम, सहिष्णुता, त्याग, इतरांशी जमवून घेणं, प्रसंगी आपली वस्तू आपल्या भावंडाला देणं हे सारं मुलं सहजपणे शिकतात. बदलत्या सामाजिक संदर्भामुळे आढळणारी विभक्त कुटुंबपद्धती, आई-बाबांचं नोकरी-धंद्यासाठी बराच काळ घराबाहेर असणं, राष्ट्रीय गरज म्हणून 'हम दो-हमारे दो' किंवा हमारी/हमारा एक यामुळे मुलांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो. मुलं मागतील त्या वस्तू लगेच मिळतात. खेरीज अनेक वेळेला ही वस्तू महाग आहे, फक्त तुझी आहे, इतरांना-मित्रांना दाखवू नको असंही सांगितलं जातं. यामुळे साहजिकच ही मुलं

स्वार्थी, हट्टी, स्वकेंद्री होतात. यामुळे एकतर्फी प्रेमातून भयानक घटना घडल्याचे आपण पाहिले आहे. त्या मुलीला मी पसंत नसलो तरी माझं तिच्यावर प्रेम आहे, ती माझीच झाली पाहिजे. ती माझी होणार नसेल तर दुसऱ्या कुणाचीच होणार नाही या विचाराने तिच्यावर ॲसिड फेकून तिला विद्रूप करणे किंवा तिच्यावर प्राणघातक हल्ला करून तिला या जगातूनच नाहिशी केलं जातं किंवा आत्महत्या केली जाते.

अशा घटनांना प्रतिबंध बसावा म्हणून आजकाल शैक्षणिक संस्थांमध्ये पालक सभा घेतल्या जातात. काही स्वयंसेवी संस्थांकडून सुजाण पालकत्वासाठी मार्गदर्शन शिबीरं घेतली जातात. वृत्तपत्रं, दूरदर्शन, आकाशवाणी यांच्या माध्यमातूनही हे काम केले जाते. कारण पाल्य योग्य प्रकारे घडवणं म्हणजे पर्यायानं कुटुंब आणि समाज घडवणं. अर्थात ज्याप्रमाणे क्रोसिनची गोळी घ्या, डोकेदुखी थांबेल इतक्या सहजपणे तुम्ही या जबाबदाऱ्या पार पाडा, असे वागा म्हणजे पाल्याबाबतचे सारे प्रश्न सुटतील असं सांगता येणार नाही. कारण हे प्रश्न व्यक्तिनिहाय असतात. प्रत्येक कुटुंबाच्या समस्याही वेगळ्या असतील. अति लाडामुळे किंवा अति रागावण्यामुळेही समस्या निर्माण होतात. मुलांना वाढवत असताना आई-वडलांनी घराचं घरपण तर सांभाळलंच पाहिजे, पण स्वत:मध्ये बदल करणं अत्यावश्यक आहे असं म्हणावंसं वाटतं.

'पालक' या शब्दातील तीन अक्षरं आई-बाबांना नेमकी कोणती जबाबदारी पार पाडायची आहे हे विशद करतात.

**पा** : योग्य प्रकारचे अन्न, वस्त्र, निवारा देऊन, आपल्या वागण्या व बोलण्यातून शारीरिक आणि मानसिक पालन पोषण.

**ल** : मुलांच्या शारीरिक आणि वैचारिक मानसिकतेवर लक्ष ठेवणे.

**क** : पाल्याच्या योग्य भविष्यासाठी काळजी करायची, पण तू हेच कर, तेच कर अशी कटकट न करणे.

पाल्याला अगदी चांगल्या शाळेत घालणे, त्याचा अभ्यास चांगला व्हावा म्हणून एखादी स्पेशल शिकवणी लावणे, वेळेवर जेवायला घालणे, त्याच्या मागणीनुसार विचारपूर्वक योग्य वस्तू घेऊन देणे म्हणजे पालकत्त्व नव्हे. खरं तर मुलांना शिकवणी लावू नये. बऱ्याच वेळेला हा विषय शाळेत तर शिकवला जाणार आहे, म्हणून किंवा याउलट विचाराने मुलं दोन्ही ठिकाणी लक्ष एकाग्र करत नाहीत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मुलांसाठी तुम्ही वेळ दिला पाहिजे. त्यांची शाळा, शिक्षक, मित्र-मैत्रिणी यांच्याविषयी आपल्या मुलांशी अगदी सहजपणे संवाद साधला पाहिजे. हजरी घेतल्याप्रमाणे रोजच्या रोज अशी चौकशी करण्याची गरज नसते; पण अधूनमधून सहजपणे संवाद व्हावा, पाल्याचे मित्र-मैत्रिणी यांच्याविषयी, त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीविषयी माहिती असणे हितावह असते.

आई म्हणजे मुलांच्या चुका पोटात घालणारी, मुलानं कितीही चुका केल्या तरी भावनाप्रधान होऊन त्याला वाचवण्याचा प्रयत्न करणारी, पण काही वेळेला तिने स्वत:ला यातून बाहेर काढले पाहिजे. आईनं पालक झालं पाहिजे. पाल्यांच्या भविष्यासाठी त्याला त्याच्या चुकीची जाणीव करून देऊन प्रसंगी थोडेसे कठोर शब्दात सुनावले पाहिजे.

आपल्यापैकी अनेक जणांना एक थोडीफार अतिशयोक्तीपूर्ण गोष्ट माहीत आहे. एका तरुणाला खूप झटपट, काहीही करून श्रीमंत व्हायचं असतं. त्याच्या आईचा या गोष्टीला विरोध असतो. हा तरुण एका भोंदूबाबांकडे जाऊन श्रीमंत होण्यासाठी उपाय विचारतो. तो सांगतो, 'आईला मार, तिचं काळीज मला आणून दे. तू लगेच श्रीमंत होशील.' त्यानुसार तो तरुण कृती करतो आणि आईचे काळीज घेऊन त्या भोंदूबाबाकडे रात्रीच्या अंधारात पळत सुटतो. वाटेत एका दगडाला ठेच लागून तो पडतो.

नैसर्गिकपणे त्याच्या तोंडून 'आई गं' अशी आर्त हाक बाहेर पडते. तो पडतो तेव्हा हातातलं आईचं काळीजही पडतं. पण त्या काळजातून आवाज येतो – ''बाळा, तुला लागलं तर नाही ना?'' मला इथं एक सत्यघटना सांगावीशी वाटते. २२-२३ वर्षांचा तरुण. दारुच्या प्रचंड व्यसनामुळे किडनी निकामी होऊन मृत्यूच्या उंबरठ्यावर उभा. आईनं मुलाला धीर दिला. 'माझी एक किडनी मी तुला देईन, पण किमान चार महिने तू दारूचा थेंबही घेणार नाहीस, असं झालं तर मी तुला मृत्युच्या दाढेतून बाहेर काढेन.' दर दिवशीचा आईचा कठोरपणा कामी आला. आज तो सुखाने आपले आयुष्य जगत आहे.

पाल्याकडून अपेक्षा ठेवा. मागणी नको. अपेक्षा लवचिक असते, मागणीमध्ये दुराग्रह असतो. काही-सुमारे ३०-३५ वर्षांपूर्वीची घटना. दोघे मित्र. दोघेही हुशार होते. १२ वी च्या परीक्षेत दोघांचीही गुणवत्ता यादीत येण्याची क्षमता होती. यांबाबत एकाच्या घरात अपेक्षा तर दुसऱ्या घरी मागणी. परीक्षा छान पार पडली. निकाल लागला. दोघांनाही समान गुण पडले, पण गुणवत्ता यादीतील समावेश केवळ दोन गुण कमी पडल्याने हुकला. अपेक्षा असलेल्या घरात आनंद, तर मागणी असलेल्या घरात चुटपुट, काहीशी निराशा, जी शब्दातून बाहेर पडत होती. दोघांनीही नामांकित कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. होस्टेलमध्ये राहू लागले. सारं काही छान चालू होतं. अधूनमधून फोनवर घरच्यांशी बोलणं होई. मागणी असलेल्या घरातून फोनवर आता दुसरी मागणी मांडली जात होती. आता या अभ्यासक्रमात होणाऱ्या प्रत्येक परीक्षेत तुझा पहिला नंबरच आला पाहिजे. प्रथम परीक्षा सुरू झाली. परीक्षेचा पहिला दिवस. दोघे मित्र परीक्षेला निघाले. खोलीचं दार बंद करणार इतक्यात फोनची रिंग वाजू लागली. पहिल्या नंबरची मागणी असलेल्या घरांतून बाबांचा फोन होता. मी पाठोपाठ येतो, तू पुढे हो असं आपल्या मित्राला सांगून त्याने खोलीचं दार ढकललं. छतावरच्या पंख्याला फास घेऊन आयुष्य संपवलं. फोनची रिंग वाजत होती, फोन घेणारा आऊट ऑफ रेंज निघून गेला होता.

थोडीफार अशीच पण टोकाला न गेलेली घटना. माझ्या चांगल्या परिचयातलं एक कुटुंब. बेताची आर्थिक परिस्थिती. तीन मुलं. तिन्ही हुशार. पहिली दोन मुलं इंजिनिअर होऊन परदेशात गेली. तिसरा मुलगा डॉक्टर व्हावा अशी आई-वडिलांची इच्छा, खरं तर आग्रह,. त्या मुलाची डॉक्टर होण्याची मानसिकता नव्हती. पण तसं स्पष्ट आई-वडलांना सांगण्याचं धाडस नव्हतं. शास्त्र शाखेला प्रवेश घेतला. कॉलेजला नियमीत जात होता. अतिशय शांत स्वभावाचा मितभाषी मुलगा. वार्षिक परीक्षेच्या आधी दोन दिवस तापाने फणफणला. ताप उतरण्याचं नाव घेईना. माझे मोठे दिर सहज त्यांच्या घरी गेले होते. वार्षिक परीक्षा झाली नाही तर वर्ष फुकट जाणार म्हणून त्याची आई काळजीत होती. शिक्षण क्षेत्राशी संबंधित माझ्या दिरांनी असं काही होणे शक्य नाही हा विश्वास त्यांना दिला आणि त्या मुलाची चौकशी करायला गेले. त्याच्याशी बोलता बोलता सहज टेबलावरची एक वही उघडून ते पाहू लागले. एकापेक्षा एक उत्तम चित्रांनी संपूर्ण वही भरली होती. ती चित्रं त्या मुलानं काढली होती.

माझे दिर ती चित्रं पाहून अचंबित झाले. ते त्याला म्हणाले, ''अरे भगवंतानं तुला दिलेले हे अभूतपूर्व वरदान आहे. ते वाया जाऊ देऊ नकोस. चित्रकलेशी निगडीत एखादा अभ्यासक्रम पूर्ण कर. डॉक्टर होणं तुझ्यासाठी कठीण नाही, पण ईश्वराचं हे मिळालेलं देणं वाया घालवू नकोस.'' यावर तो चटकन् म्हणाला, ''काका, मला डॉक्टर होण्यात आजिबात रस नाही, पण हे माझ्या आई-बाबांना विशेषत: माझ्या आईला सांगण्याचं धाडस होत नाही. मी डॉक्टरच झालं पाहिजे हा तिचा हट्ट आहे. माझा नकार ती पचवू शकणार नाही, अशी मला भीती वाटते.

''आताचे जग वेगळे आहे, कलानिकेतन किंवा स्कूल ऑफ आर्टसारख्या संस्थेत प्रवेश घेऊन

चित्रकलेच्या क्षेत्रातील शिक्षण घ्यावं असं मला वाटतं. केवळ आईसाठी मी शास्त्र शाखेत प्रवेश घेतला. कॉलेजला जातो. तासांनाही बसतो. पण माझं मन लागत नाही. घरी आल्यावर पुस्तक उघडून बसतो इतकंच. हे पाहून दोन-चार दिवस गेले की आई म्हणते - असाच भरपूर अभ्यास कर. १२ वी ला चांगले गुण मिळवून मेडिकलला प्रवेश घेतला की झालं. काका, माझ्या मनावर विचित्र तणाव आहे. माझ्याकडून काहीतरी चुकीचं पाऊल उचललं जाण्याची मला भीती वाटते. मी बहुतेक घर सोडून पळून जाईन !''

माझ्या दिरांनी त्याला, मी न कंटाळता प्रयत्न करून तुझ्या आईची समजूत घालेन, ज्यामुळे तुला मनासारखी निश्चितच संधी मिळेल असा मी तुला शब्द देतो असे सांगितले. आणि झालेही तसेच.

आपण मुलांना जन्म देतो, त्यांच्यासाठी खस्ता काढतो, त्यामुळे पालकांनी आपल्या मुलाच्या भविष्याबाबत अपेक्षा बाळगणे चूक नाही, पण त्याच्याही मनाचा आणि आयुष्याचा विचार केला पाहिजे. 'पालक' शब्दातल्या 'क' अक्षराच्या अर्थाच्या आहारी जाऊ नका. पालकत्त्वाला इतरही अनेक कंगोरे आहेत. या सर्वांचा विचार आपण पुढील लेखात करू.

**- कमल हर्डीकर,** मोबा. ९६८९३६९९२६,

## मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**पान ७ वरून पुढे...**

सुरुवात केली. संध्याकाळी चार वाजता सोनप्रयाग येथे आलो. तिथून शेरसी येथे मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचलो. सोनप्रयाग येथूनच वीस किलोमीटर अंतरावर त्रियुगी नारायण हे महत्त्वाचे स्थान आहे, तिथे शंकर-पार्वती विवाह झाल्याचे सांगितले जाते.

**- ओंकार गाडगीळ,**
मोबा. ९८२२८७६९२२

## कल्पक्कमची कमाल !

**पान ९ वरून पुढे...**

**स्वच्छ हवा :** कार्बनचे उत्सर्जन कमालीचे कमी होईल आणि आपल्या पुढच्या पिढीतील मुलांना प्रदूषणापासून मुक्त, स्वच्छ हवा श्वास घेण्यासाठी मिळेल !

**राष्ट्रीय सुरक्षा :** जेव्हा आपण ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी बनू, तेव्हा जागतिक स्तरावर एक महासत्ता म्हणून भारताची पकड अनेक पटीने मजबूत होईल !

कल्पक्कम हे आता केवळ एका ठिकाणाचे नाव राहिलेले नाही; ते भारताच्या वैज्ञानिक आत्मविश्वासाचे प्रतीक बनले आहे.

सर्व अडथळे, तंत्रज्ञानावरील बंदी आणि परदेशी देशांची टीका झुगारून आज भारत अणुऊर्जा आणि हरित ऊर्जेच्या (Green Energy) क्षेत्रात अभिमानाने सिंहासनावर विराजमान झाला आहे. आपण खेळांमधील विजय साजरे करतो. चला, हा महान वैज्ञानिक विजय देखील साजरा करूया ! जो देशाचे नशीब बदलणार आहे.

**- आंतर्जालावरून साभार**

## निधन वार्ता !

कोल्हापूर चित्पावन संघाचे सभासद आणि नवस्नेह मासिकाचे माजी संपादक **चंद्रकांत जोशी सर** यांचे दि. २५ जुलै रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ७९ व्या वर्षी दु:खद निधन झाले !

कोल्हापूर चित्पावन संघाचे ज्येष्ठ सभासद **राजाराम शंकर गोरे** यांना दि. ७ ऑगस्ट रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली!

तसेच कोल्हापूर चित्पावन संघाच्या सभासद **श्रीमती ज्योती भास्कर म्हस्कर** यांचे दि. ८ ऑगस्ट रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले !

मृत व्यक्तींच्या आत्म्यास सद्‌गती लाभो ! त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो ! कोल्हापूर चित्पावन संघ त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे !

# ‘भारतरत्न’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म एप्रिल १४ इ.स. १८९१ साली मध्य प्रदेशातील इंदूर जिल्ह्यामधील महू या लष्करी छावणी असलेल्या गावात झाला.भीमराव आई-वडिलांचे १४वे अपत्य होते. त्यांचे कुटुंब त्याकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे आणि मूळचे महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात असलेल्या आंबडवे गावचे होते. मालोजीराव हे रामजींचे वडील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आजोबा होते. आजोबा मालोजीराव इंग्रजी राजसत्तेत सैन्यात शिपाई म्हणून भरती झाले होते. सैन्यातील नोकरीमुळे सैनिकी शाळेत म्हणजेच ‘नार्मल स्कूल’ मध्ये शिक्षण घेऊ शकले. भीमरावांचे वडीलही ब्रिटिशांच्या भारतीय सेनेत नोकरी करत होते आणि तेथे त्यांनी मराठी व इंग्रजी भाषेचे यथाविधी शिक्षणही घेतले होते. अवघ्या ५ वर्षीय भीमरावांच्या आई भीमाबाईंचे निधन झाले. त्यानंतर त्यांचे संगोपन त्यांच्या आत्या मीराबाईंनी केले. इ.स. १८९६ मध्ये सुभेदार रामजींनी आपल्या परिवारासह दापोली सोडली. सुभेदार रामजींनी इ.स. १८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील ‘कॅम्प स्कूल’ मध्ये भीमरावाचे नाव दाखल केले.वडील रामजी आंबेडकर यांनी साताऱ्यातील गव्हर्नमेंट हायस्कूल (आताचे श्री. छ. प्रतापसिंह हायस्कूल) मध्ये ‘आंबडवेकर’ असे आडनाव ७ नोव्हेंबर १९०० रोजी नोंदवले. साताऱ्याच्या या शाळेत बाबासाहेबांना शिकवण्यासाठी कृष्णा केशव आंबेडकर नावाचे देवरूखे ब्राह्मण शिक्षक होते. शाळेच्या दप्तरात नोंदवलेले भीमरावाचे ‘आंबडवेकर’ हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनिडे वाटत असे. त्यामुळे तेव्हापासून त्यांचे आडनाव ‘आंबडवेकर’चे ‘आंबेडकर’ झाले. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर बाबासाहेब आंबेडकर नावाने ओळखले जात.

रामजी आंबेडकरांनी इ.स. १८९८ साली हे कुटुंब मुंबईला नेले. भीमराव हे एलफिन्स्टन रस्त्यावरील सरकारी शाळेतील विद्यार्थी बनले. इ.स. १९०७ साली तरूण भीमरावांनी मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा यशस्वीरीत्या पास केली. इ.स. १९०८ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या एलफिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. इ.स. १९१२ मध्ये त्यांनी त्याच मुंबई विद्यापीठाची राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र विषय घेऊन बी.ए. ची पदवी संपादन केली आणि बडोदा संस्थानात नेकरीसाठी रूजू झाले.पुढे बडोदा नरेशांकडून प्रति महिने २५ रुपये शिष्यवृत्ती घेऊन, अमेरिकेला कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रयाण केले. कोलंबिया विद्यापीठाला दि. १५ मे १९१५ रोजी ‘ॲडमिशन ॲंड फायनान्स ऑफ इस्ट इंडिआ कंपनी’ हा प्रबंध सादर केला. २ जून १९१५ रोजी या प्रबंधाच्या आधारावर त्यांना एम.ए. पदवी मिळाली. प्रा. सेलिग्मन आंबेडकरांचे पीएच.डी. पदवीसाठीचे

मार्गदर्शक होते. 'भारताचा राष्ट्रीय लाभांश : इतिहासात्मक आणि विश्लेषणात्मक अध्ययन' हा भीमराव आंबेडकरांचा पीएच.डी. साठीचा विषय होता. त्यांनी इ.स १९१३ ते इ.स. १९१७ या विद्याभ्यासाच्या कालावधीत हा प्रबंध लिहिला. ३० सप्टेंबर १९२० रोजी त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या संस्थेत त्यांचा 'प्रॉव्हिन्शियल डीसेंट्रलायझेशन ऑफ इम्पिरियल फायनान्स' प्रबंध लंडन विद्यापीठाने स्वीकारून २० जून १९२१ रोजी त्यांना मास्टर ऑफ सायन्स ही पदवी प्रदान केली. २८ जून १९२२ रोजी ग्रेज-इन संख्येने त्यांना बार-ॲट-लॉ (बरिस्टर) ही वकिलीची पदवी प्रदान केली. त्यानंतर 'द प्रोब्लम ऑफ रुपी' हा प्रबंध तयार करून 'डॉक्टर ऑफ सायन्स' (डी.एस्सी.) या पदवीसाठी ऑक्टोबर १९२२ मध्ये लंडन विद्यापीठात सादर केला. नोव्हेंबर १९२३ मध्ये त्यांना लंडन विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी बहाल केली. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठामध्ये डॉ. ए. ए. गोल्डनविझर यांनी मानववंशशास्त्र विषयक भाग घेण्यासाठी भीमराव आंबेडकरांना बोलविले. त्यांनी आपला विषय ठरवला - 'भारतातील जाती, त्यांचा उगम, विकास आणि वास्तविकता'. तरुण आंबेडकरांनी या आपल्या शोध पुस्तिकेत जातिसंस्था विषयक खालिल सिद्धान्त मांडले.वर्ग आणि जात तसे मानायचे झाले, तर निकटवर्ती होत. कालांतराने ते अलग होतात. बंदिस्त केलेली, गोठवलेला वर्ग म्हणजे 'जात'.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जात' या संकल्पनेची चिकित्सा करून शोध घेण्याचा प्रयत्न केला.

बाबासाहेबांनी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१९ बाबत साऊथबरो कमिटीसमोर आपले विचार मांडले. यावेळी त्यांनी दलित व इतर मागासलेल्या समाजांसाठी वेगळे मतदान विभाग व आरक्षण यांची मागणी केली. इ.स. १९२० साली त्यांनी मुंबईत मूकनायक नावाचे वृत्तपत्र सुरू केले .संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. ४ ऑगस्ट इ.स. १९२३ रोजी ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी.के. बोले यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळात एक ठराव पास करून घेतला. त्यानुसार महाडच्या नगरपालिकेने आपल्या ताब्यातील चवदार तळे अस्पृश्यांना खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना तळ्यातून पाणी भरू दिले नाही. बाबासाहेबांनी १९ मार्च व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे कुलाबा परिषद भरवली, अध्यक्ष स्वत: बाबासाहेब होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधरपंत सहस्त्रबुद्धे आणि बापूराव जोशी हे दलितेतर सवर्ण व ब्राह्मण नेते होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करून पुढील ठराव पास झाले. स्पृश्य (सवर्ण) लोकांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे.स्पृश्य लोकांनी अस्पृश्यांना त्यांचे नागरिकत्वाचे अधिकार बजाविण्याच्या कामात मदत करावी.मृत जनावरे ज्याची त्यांने ओढावी. स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे. २० मार्च १९२७ रोजी परिषदेतील सर्वांनी आपला मोर्चा चवदार तळ्याकडे वळवला. बाबासाहेब सर्वप्रथम तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले, त्यानंतर आंबेडकरानुयायांनी त्यांचे अनुसरण केले. ही घटना रूढीवादी हिंदुंना सहन झाली नाही. 'अस्पृश्यांनी तळे बाटवले' असे म्हणून त्यात गोमूत्र टाकून तळ्याचे ब्राह्मणांकडून शुद्धीकरण केले. पुढे महाडच्या नगरपालिकेने अस्पृश्यांना चवदार तळे खुले केल्याचा ठरावही रद्द केला.

बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. सामाजिक व राजकीयदृष्ट्या तळागाळात फेकल्या गेलेल्यांना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर आणणे, हे ह्या सभेचे ध्येय होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते दलितांच्या सर्व समस्या या मनुस्मृतीमुळे निर्माण झालेल्या आहेत. हा ग्रंथ सुमारे २००० वर्षापूर्वी मनूने लिहिला असला तरी तो रूढीवादी हिंदूंच्या जीवनाचे आजही नियंत्रण

करतो. मनुस्मृतीने कनिष्ठ जातींवर अनेक अपात्रता लादल्या तर उच्च जातींना अनेक विशेषाधिकार दिले. मनुस्मृती हा ग्रंथ अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाचे, क्रूरतेचे व विषमतेचे प्रतीक आहे. म्हणून मनुस्मृतीचे २५ डिसेंबर इ.स. १९२७ रोजी समारंभपूर्वक जाहीरपणे दहन केले. मनुस्मृती दहनापूर्वी डॉ. आंबेडकरांनी म्हंटले की ''मनुस्मृतीचे दहन केले ते शतकानुशतके आम्ही ज्या अन्यायाखाली चिरडले गेलो त्याचे प्रतिक म्हणून..!'' तेव्हापासून दरवर्षी '२५ डिसेंबर' हा दिवस मनुस्मृती दहन दिन म्हणून साजरा केला जातो. अमरावती येथील प्राचीन 'अंबादेवी मंदिरात' प्रवेशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा सत्याग्रह डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली २६ जून इ.स. १९२७ रोजी सुरू झाला. अमरावती नंतर पुण्यातील 'पर्वती टेकडीवरील मंदिर' अस्पृश्यांना खुले नव्हते. हे मंदिर दलितांसाठी खुले करावे म्हणून सर्वांनी १३ ऑक्टोबर इ.स. १९२९ रोजी पुणे पर्वती सत्याग्रह सुरू केला. यात शिवराम कांबळे, एम एम जोशी, ना ग गोरे, र के खाडिलकर, विनायक भुस्कुटे, पां ना राजभोज व स्वामी योगानंद यांच्यासहित अनेक स्त्री पुरुषांनी सत्याग्रहात भाग घेतला होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक या ठिकाणी काळाराम मंदिर सत्याग्रहाची घोषणा केली. २ मार्च १९३० रोजी नाशिकमध्ये ८००० महार सत्याग्रहीनी काळाराम मंदिर सत्याग्रह यशस्वी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा पहिला संप घडवून आला होता. हा संप इ.स. १९२८-१९३४ या कालावधीत चरी (रायगड जिल्हा) सुरू होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धत नष्ट करण्यासाठी संघर्ष केला. १४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शेतकरी परिषद चिपळूण येथे आयोजन करण्यात आली होती. या परिषदेत त्यांनी कोकणातील खोतीदारीविरूद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू केले. या संबंधी १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधिमंडळात मांडले. १० जानेवारी १९३८ रोजी बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली २५,००० शेतकऱ्यांचा मोर्चा विधिमंडळावर काढण्यात आला.

सन १९३०, १९३१ व १९३२ या वर्षी गोलमेज परिषदा झाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र पीडित, शोषित व दलितांचे प्रतिनिधी म्हणून लंडनच्या तिन्हींही गोलमेज परिषदांना हजर राहिले. भावी स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांचे हितसंरक्षण करण्याच्या हेतूने त्यांनी इंडियन राऊंड टेबल कॉन्फरन्सला मागण्या सादर केल्या. त्यात कायदेमंडळात अस्पृश्यांना भरपूर प्रतिनिधीत्व देण्यात यावे, सरकारी नोकऱ्यात अस्पृश्यांची भरती करण्यात यावी, गव्हर्नर जनरलच्या मंत्रीमंडळात अस्पृश्यांचे प्रतिनिधी घेतले जावे. अशा विविध मागण्यांचा समावेश होता. अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र राजकीय हक्क मिळाले पाहिजे आणि अस्पृश्य मतदारसंघातून अस्पृश्यांनी आपले उमेदवार निवडले पाहिजेत, तसेच त्यांना नोकऱ्यांमध्ये व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळाव्या.' अशा प्रकारचा खलिता परिषदेला सादर केला.

दि. २४ सप्टेंबर १९३२ रोजी, येरवडा जेलमध्ये जयकर, तेज बहादुर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर. या दिवशी पुणे करारावर सही झाली. २६ सप्टेंबर इ.स. १९३२ रोजी ब्रिटिश मंत्रिमंडळाने पुणे करार मंजूर करून घेतला. त्यावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले. तिकडे दिल्लीत हिंदु महासभेनेही आपली मंजुरी दिली. अशा प्रकारे पुणे करार घडवून गांधींनी दलितांचे अत्यंत महत्त्वाचे असे दोन अधिकार काढून घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इ.स. १९३६ मध्ये लोकशाही मूल्यांवर आधारित असणारा 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. आपल्या राजकीय पक्षास

राष्ट्रीय स्वरूप देण्यासाठी त्यांनी 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनची' इ.स. १९४२ मध्ये स्थापना केली.

कनिष्ठ जातीतील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. या संघटनेच्या वतीने सोलापूर येथे जानेवारी ४, इ.स. १९२५ रोजी एक वसतिगृह सुरू केले. १४ जून १९२८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित शिक्षणसंस्थेची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ रोजी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेच्यावतीने १९४६ मध्ये मुंबईत सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय, १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय, १९५३ मध्ये मुंबईत सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय तर १९५६ मध्ये मुंबईत सिद्धार्थ विधी महाविद्यालय सर्व समाजांसाठी सुरू केले.

१३ ऑक्टोबर इ.स. १९३५ रोजी येवला येथे परिषद भरली. या परिषदेत 'मी अस्पृश्य जातीत जन्माला आलो ते माझ्या हाती नव्हते. हिंदू म्हणून मी जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही घोषणा येथील तत्कालीन समाजव्यवस्थेला दिलेला मोठा धक्का होता. 'भारतात जन्मलेल्या, जातिभेद न मानणाऱ्या सर्वांना समान समजणाऱ्या आमच्या बौद्ध धम्मात आपण व आपले अनुयायी आल्यास तुम्हां सर्वांचा मोठा उत्कर्ष होईल. मानवी मूल्ये जोपासणारा आमचा बौद्ध धम्म उभ्या जगात पसरला आहे. भूतलावरील प्रत्येक कानाकोपऱ्यात आमच्या बौद्ध धम्माची मोठी ख्याती, अनुयायी व धम्मबांधव आहेत. आशिया खंडातील बहुसंख्य देशानी बौद्ध धम्म स्वीकारलेला आहे. ईश्वराला महत्त्व न देणारा व समस्त मानव जातीला स्वातंत्र्य, समता व बंधूत्व शिकविणारा आमचा बौद्ध धम्म तुमचा तेजोमय भविष्य घडवून आणेल. तळागाळातल्या लोकांच्या प्रती अत्यंत करुणा बाळगणारा बौद्ध धम्म तुम्हां सर्वांचा इतिहास रचेल. अशा प्रकारचा एकंदरीत संदेश बाबासाहेबांना मिळाला. १९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला.

एप्रिल १९४६ मध्ये नवीन प्रांतिक सरकारांच्या कामकाजाला सुरुवात झाली. तशी भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया इ.स. १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्यापासून सुरू झाली होती. आणि शेवट हा २६ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेने संविधान स्वीकारापर्यंत ती चालली. २६ जानेवारी १९५० रोजी भारत प्रजासत्ताक झाला. १९५० च्या दशकात बौद्ध भिक्खुंनी त्यांना बोधिसत्व ही बौद्ध धर्मातील उपाधी प्रदान केली. १९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला व लक्षावधी दलितांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्यांचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर, १९५६ रोजी झाले. इ.स. १९९० साली त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**- विकास मेहेंदळे,**
मोबा. ९४२०१५५११४


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**॥ अवीट गोडीचे श्रीरामायण ॥**

## राम जन्मला गं सखी

चैत्रमास, त्यांत शुद्ध नवमि ही तिथी
गंधयुक्त तरिहि वात उष्ण हे किती !

दोन प्रहरिं कां ग शिरीं सूर्य थांबला ?
राम जन्मला ग सखी राम जन्मला

कौसल्याराणि हळू उघडि लोचनें
दिपुन जाय माय स्वतः पुत्र–दर्शनें
ओघळले आंसु, सुखे कंठ दाटला

राजगृहीं येइ नवी सौख्य–पर्वणी
पान्हावुन हंबरल्या धेनु अंगणीं
दुंदुभिचा नाद तोंच धुंद कोंदला

पेंगुळल्या आतपांत जागत्या कळ्या
'काय काय' करित पुन्हां उमलल्या खुळ्या
उच्चरवें वायु त्यांस हंसुन बोलला

वार्ता ही सुखद जधीं पोंचली जनीं
गेहांतुन राजपथीं धावले कुणी
युवतींचा संघ एक गात चालला

पुष्पांजलि फेंकि कुणी, कोणी भूषणें
हास्याने लोपविले शब्द, भाषणें
वाद्यांचा ताल मात्र जलद वाढला

वीणारव नूपुरांत पार लोपले
कर्ण्याचे कंठ त्यांत अधिक तापले
बावरल्या आम्रशिरीं मूक कोकिला

दिग्गजही हलुन जरा चित्र पाहती
गगनांतुन आज नवे रंग पोहती
मोत्यांचा चूर नभीं भरुन राहिला

बुडुनि जाय नगर सर्व नृत्यगायनीं
सूर, रंग, ताल यांत मग्न मेदिनी
डोलतसे तीहि, जरा, शेष डोलला

अयोध्येत आनंदपर्वाची सुरुवात झाली. रघुवंशात चार वेदांसारखे पवित्र, असामान्य, अद्वितीय अशा चार सुपुत्रांचा जन्म झाला. रामाच्या अवतार कार्याला सुरुवात झाली. रामाचा जन्म झाल्याने फक्त राज परिवार आनंदित झाला असे नाही, तर सर्व प्रजा आनंदली. सृष्टी बहरली, पशू पक्षी नाचू लागले, शेष डोलू लागला, पृथ्वी आनंदाने थरथरली. स्वतःच्या पुत्राचे तेज पाहून कौसल्येचे डोळे दिपून गेले. कैकयी आणि सुमित्रेच्या आनंदाला तर सीमाच राहिली नाही. दशरथ राजाचे मनोरथ पूर्ण झाले. देव, गन्धर्वांनी आकाशातून पुष्पवृष्टी केली. चारही भावंडांचा नामकरण विधीही मोठ्या थाटात पार पडला. त्याला अनेक दिवस उलटून गेले, तरी अयोध्येतील प्रजा राम जन्माचे गीत गात होती. आनंदोत्सव साजरा करीत होती. ग दि माडगूळकरांनी या गीतात वापरलेले उपमा अलंकार नक्की पहा.

**– सुधीर दाजी जोशी,**
९८२२२९८७२६

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - सप्टेंबर २०२६)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रुपये | पालकांचे नाव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शमिका – | कोकणस्थ | २३/७/९९ ५.१ | वशिष्ठ, वृश्चिक, अनुराधा १ ले, मध्य, देव | एम,एस्सी., बायो-टेक्नॉलॉजी | औरंगाबाद संभाजीनगर येथे | मा.प्रा. १२ हजार | शमिका दाते औरंगाबाद, संभाजीनगर ९८२३०५१३०२ |
| २. | अनुराधा – | कोकणस्थ | २८/२/९७ ४.१० | शांडिल्य, तूळ, विशाखा २ रे, अंत्य, राक्षस | एम,एस्सी., बायो-टेक्नॉलॉजी | ठाण्यात नोकरी वर्क फ्रॉम होम | मा.प्रा. ६४ हजार | अनुराधा जोशी ठाणे ९८२१३००९०९ |
| ३. | प्राजक्ता – | देशस्थ | २५/७/९१ ५.६ | वशिष्ठ, पूर्वाषाढा, पहिले, मध्य, मनुष्य | बी. कॉम. | ऐरोली येथे नोकरी | ९.६ लाख वा.प्रा. | प्राजक्ता सरदेशपांडे ऐरोली, मुंबई ९६५३२१७६६७ |
| ४. | मधुरा – | कऱ्हाडे | २५/२/९४ ५.७ | वशिष्ठ, सिंह, मघा, पहिले, अंत्य, राक्षस | सी ए | मुंबई येथे नोकरी | १.६० लाख मा.प्रा. | मधुरा प्रभुदेसाई मुंबई ९९६९८०७७०९ |
| ५. | वीणा – | देशस्थ ऋ | २७/७/९४ ५.५ | भारद्वाज, मीन, उत्तरा भाद्रपदा, १ ले, मध्य, मनुष्य | बी.ए.एल.एल.बी शास्त्रीय व सुगम संगिताच्या परिक्षा | मुंबई येथे नोकरी | ३.६० लाख वा.प्रा. | वीणा कुलकर्णी मुंबई ९८९२८५३६२२ |
| ६. | आदिती – | कोकणस्थ | १०/९/९५ ५.१ | अत्री, मीन, उत्तरा भाद्रपदा दुसरे, मध्य, मनुष्य | स्पॅनिश भाषेचे शिक्षण चालू | नोकरी आहे | ३ लाख वा.प्रा. | आदिती जोशी खारघर ९९८७५७१५४० |
| ७. | ईशा – | देशस्थ | २४/११/९७ ५.३ | वशिष्ठ | एम.ई. (कॉम्प्युटर ॲण्ड इलेक्ट्रीकल) | ऑस्ट्रेलियात नोकरी | १.२० ऑस्ट्रेलियन डॉलर्स वा.प्रा. | ईशा जोशी +६१४०७७३०३१४ +६१४१४६९७९७२ |
| ८. | डॉ. श्रेया – | कऱ्हाडे | ५/११/९४ ५.२ | गौतम, वृश्चिक, अनुराधा, तिसरे, मध्य, देव | एम.बी.बी.एस. एम.डी (मेडि.) | इंडोक्रिनो-लॉजी (युके) | – | डॉ. श्रेया भाटे युके ९८२१३६६८१२ |
| ९. | गिरिजा – | देशस्थ यजू | १०/५/९९ ५.५ | भारद्वाज, कुंभ, शततारका, पहिले, आद्य, राक्षस | बी.कॉम. एस.ए. पी.एस.के.ओ. जर्मन भाषा बी-१ लेव्हल | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख | गिरिजा मेठी पुणे ९८२२६०९८५३ |
| १०. | मेखला – | देशस्थ यजू | १७/५/९० ५.६ | काश्यप, मकर, श्रवण, चौथे, अंत्य,देव | ए.बी.ए (एच.आर.) जपानी भाषा ३ री लेव्हल | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. २० लाख | मेखला कोण्णूर पुणे ७२७६४५८६२८ |

**अदिती शिवराम कुलकर्णी** – रक्त गट AB-ve

**जन्मतारीख :** १९/९/२००० **उंची :** ५ फूट

**शिक्षण :** B.Tech. कमिन्स कॉलेज पुणे येथे.

**नोकरी :** मुंबई येथे (जे.पी.मॉरगन) (वा. प्रा. १५ लाख),

**पोटशाखा :** देशस्थ ऋ. **अपेक्षा :** अनुरूप, शाकाहारी

**पत्ता : श्री. शिवराम कुलकर्णी,** गुलाबनगर, पाचगांव रोड, कोल्हापूर **मोबाईल :** ९४२२४१८५८५, ९४०५३२७५७५

**पियूषा अनिल कुलकर्णी** – रक्त गट O +ve

**जन्मतारीख :** १२/१२/१९९८ **उंची :** ५ फूट

**शिक्षण :** M. Tech (Civil) संगीत विशारद

**नोकरी :** संगीत क्षेत्रात, **(मा. प्रा. १०,०००/-)**

**पत्ता : श्री. अनिल कुलकर्णी,**

१४ वी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर.

**मोबाईल :** ९३२५३४०९०६, ९४२१११८२३५

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण | गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| काश्यप | वृषभ | रोहिणी | पहिले | अंत्य | मनुष्य | कश्यिप | कन्या | हस्त | पहिले | आद्य | देव |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - सप्टेंबर २०२६)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रुपये | पालकांचे नाव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नीरज – | देशस्थ | २/६/९४ ५.८ | गौतम, कुंभ,पु. भाद्रपदा, तिसरे, आद्य, मनुष्य | B.E. M.Tech. Ph.D करतो | रायगड लोणेर येथे | – | प्रकाश पं. कुलकर्णी कोल्हापूर ८००७६७११९७ |
| २. | कौशिक O +ve | कोकणस्थ | ६/१/२००० ५.४ | कौशिक, धनु, पूर्वाषाढा, प्रथम, मध्य,मनुष्य | B.E. (Elec.) | व्यवसाय | वा.प्रा. ६ लाख | मिलींद मधुकर खरे विश्रामबाग, सांगली ९८८११४३५२२ |
| ३. | अक्षय – | कोकणस्थ | २३/६/९९ ५.७ | कपि., तूळ, स्वाती, अंत्य | B. Tech | व्यवसाय (प्रोसेसिंग युनिट) | वा.प्रा. १२ लाख | मनोज रघुनाथ लिमये लिमये मळा, सांगली ७५८८१६७०४५ |
| ४. | शुभम A -ve | देशस्थ | १८/११/९६ १७१ सेमी. | गार्ग्य, कुंभ, धनिष्ठा, चौथे, मध्य, राक्षस | MBA (HR) | नोकरी | वा.प्रा. ६ लाख | दत्तात्रय गोपाळराव कुलकर्णी नवी सांगवी, पुणे ९९२२९३३८०९ |
| ५. | दिपक – | देशस्थ | २७/७/९५ ५.६ | काश्यप, कर्क, पुष्य, पहिले, मध्य, देवगण | B.E. मेक. | गोवा येथे नोकरी | वा.प्रा. १५ लाख | शरद सदाशिव जोशी बाजार पेठ, वाळवा ७५८८४६९०१२ |
| ६. | सुशांत – | देशस्थ | ४/२/९५ ५.९ | विश्वामित्र, मीन, रेवती, दुसरे, अंत्य, देव | १२ वी नंतर कॉम्प्युटर कोर्स | व्यवसाय Com,CCTV इत्यादी | वा.प्रा. ८ ते १० लाख | संजय गणेश कुलकर्णी कळंबा, कोल्हापूर ८०८७७९६९०२ |
| ७. | रोहित – | देशस्थ | ६/१/९४ ५.११ | काश्यप, तुळ, स्वाती, दुसरे, देव, अंत्य | एम.कॉम. | MNC अकौंट ऑफिसर पुणे येथे | मा.प्रा. ५०,००० | रविंद्र सदाशिव दीक्षित साकोली कार्नर ८४४६०७१६३६ |
| ८. | चैतन्य – | कोकणस्थ | १२/५/९५ ५.८ | अत्री, कन्या, हस्त, चौथे आद्य, देव | B. E. Civil | व्यवसाय व्हॅल्युएशन वर्क | वा.प्रा. ४.८० लाख | गजानन काशीनाथ फाटक सांगली ८१४९२५३८२३ |
| ९. | गणेश – | देशस्थ | १६/५/९४ ५.७ | भारद्वाज, कर्क, पुनर्वसु. चौथे मध्य, देवगण | Diploma Computer Engineer | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ४.५० लाख | निला दिलीप कुलकर्णी पंत मळा, इचलकरंजी ७७४१८२६२३० |
| १०. | जीत – | देशस्थ | ५/७/९३ ५.८ | कौशिक, मकर, उत्तराषाढा, दुसरे, अंत्य, मनुष्य | B.A. B.Com. M.Com | जिल्हापरिषद कनिष्ठ सहायक यवतमाळ | वा.प्रा. | अनंतराव वासुदेवराव पांडे यवतमाळ ९५११९६४०६३ |

**ऋषिकेश विवेक वैद्य** – रक्त गट B+ve

**जन्मतारीख :** २०/११/२००० **उंची :** ५ फूट ७ इंच

**शिक्षण :** B.Com. अकौंटींग फायनान्स(BAF) NISM VIII

**पोटशाखा :** कोकणस्थ, **अपेक्षा :** अनुरुप, शाकाहारी

**नोकरी :** SBI मध्ये (वा.पा. ७ लाख) कोल्हापूर येथे. रत्नागिरी येथे आंबा, नारळ ,सुपारी बाग व स्वत:चे घर श्री. विवेक श्रीकृष्ण वैद्य, मो. ९४०५२५८९६४/९३०७९९३५५०

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| गार्ग्य | सिंह | पुर्वा फाल्गुनी | चौथे | मध्य | मनुष्य |

**अमित संजय जोशी** – रक्त गट B+ve

**वैवाहिक स्थिती :** विनापत्य घटस्फोटीत, **उंची :** ५.१० फूट

**जन्मतारीख :** ४/७/१९९३ **शिक्षण :** CA सीएफई (USA)

**व्यवसाय :** कोल्हापूर येथे भागीदारीत, **वा.प्रा.** १२ लाख

**पत्ता : श्री. संजय माधव जोशी,** आर. के. नगर, मातोश्री वृद्धाश्रमाजवळ, कोल्हापूर. **मोबाईल :** ९३७११३३०३३, ९३७०१२८६९२ **अपेक्षा :** समजुतदार, सुसंस्कृत, अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| शांडिल्य | धनु | पूर्वाषाढा | दुसरे | मध्य | मनुष्य |

## विद्यार्थी गुणगौरव व मान्यवरांचे सन्मान





सन्मान सोहळ्यानंतर उपस्थितांनी 'चित्पावन खाद्यमहोत्सवा'चा आस्वाद घेतला !

# कोल्हापूर चित्पावन संघ आणि परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा



रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी दोन्ही संस्थांची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित दीपप्रज्वलन करून सभेची सुरुवात झाली.



डावीकडून (१) संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर
(२) कोल्हापूर चित्पावन संघात होणाऱ्या विविध कार्यक्रमात मदत करणारे श्री. आनंदराव वासुदेव (मांडववाले) गेली २५ वर्षे संघाशी जोडले गेलेले आहेत. वार्षिक सभेत त्यांचाही सत्कार करण्यात आला.
(३) श्री.व सौ. वरदा अंदूरकर–भिडे यांच्या सामाजिक कार्याबद्दल त्यांनाही गौरवण्यात आले.
(४) रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेवेळी संस्थेतर्फे कै. द.गो.कानिटकर जीवनगौरव पुरस्कार देऊन मा. श्रीमती पद्मजा रविंद्र आपटे यांचा गौरव करण्यात आला.

## कोल्हापूर चित्पावन संघाला श्री. मंगेश फडके यांची भेट



प.पू.डॉ. श्री. श्रीकृष्ण देशमुख यांची परंपरा चालविणारे त्यांचे उत्तराधिकारी अमेरिकास्थित पूज्य श्री. मंगेश फडके यांनी नुकतीच कोल्हापूर चित्पावन संघाला सदिच्छा भेट दिली.

## कोल्हापूर चित्पावन संघाला सौ. रोहिणीताई परांजपे यांची भेट




नुकतीच ह.भ.प. सौ. रोहिणीताई परांजपे यांनी कोल्हापूर चित्पावन संघाला सदिच्छा भेट दिली. त्या भेटीचे क्षणचित्र !

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.